आम्ही ट्रॅव्हलकर युरोप समर २०१९

# पूर्वरंगी युरोप

( म्युनिकमध्ये सुरवात आणि म्युनिकमध्ये समारोप)

७ रात्री

जर्मनी * चेक रिपब्लिक * स्लोवाकिया *हंगेरी * ऑस्ट्रीया

युरोपचा अनोखा चेहरा पाहायला मिळतो तो पूर्व युरोपमध्ये.इतिहासातील बोहेमियन,हॅब्सबर्ग,ऑटोमन सत्तांपासून ते कम्युनिस्ट राजवटीपर्यंतची वाटचाल अनुभवलेल्या या प्रदेशातील निसर्गही तितकाच खिळवून ठेवणारा आहे.आल्प्सच्या बर्फाच्छादित रांगांपासून ते ब्लॅक फॉरेस्टमधल्या घनदाट अरण्यापर्यंत निसर्गाची मनमोहक रुपे इथे पाहायला मिळतात.गोल्डन सिटी प्राग,वर्ल्ड्स सेकंड बेस्ट सिटी बुडापेस्ट,मोझार्टच्या सुरांनी सजलेलं साल्झबर्ग,सिटी ऑफ ड्रीम्स व्हिएन्ना,ऑक्टोबर फेस्टचे शहर म्युनिक,टुमदार ब्रातिस्लावा,युनेस्कोच्या विश्व वारसा यादीतील चेस्की क्रुमलोव अशी एकापेक्षा एक बहारदार शहरे पूर्व युरोपमध्ये पहायला मिळतात.ऐतिहासीक वास्तूंपासून ते आधुनिक सुखसुविधांपर्यंत सगळ्याच बाबतीत पर्यटकांना सुखावणाऱ्या या पूर्व युरोपची सहल म्हणजे घ्यायलाच हवा असा अनुभव,चला अनुभवूया युरोपचे पूर्वरंग.

समाविष्ट देश आणि शहरे ---

- जर्मनी - म्युनिक
- चेक रिपब्लिक -- चेस्की क्रुमलोव * प्राग
- स्लोवाकिया - ब्रातिस्लावा
- हंगेरी -- बुडापेस्ट
- ऑस्ट्रीया - व्हिएन्ना * मौथौजन * साल्झबर्ग * वॅटन्स * इन्सब्रुक

स्थलदर्शन ---

- चेस्की क्रुमलोव ---- गायडेड सिटी टूर
- प्राग ---- गायडेड वॉकिंग सिटी टूर ,प्राग कॅसलला भेट

- ब्रातिस्लावा --- ओरिएंटेशन टूर
- बुडापेस्ट --- गायडेड सिटी टूर
- व्हिएन्ना -- गायडेड सिटी टूर ,शॉनब्रन पॅलेस ,मौथौजन कॉन्स्ट्रेशन कॅम्पला भेट
- साल्झबर्ग --- गायडेड सिटी टूर
- वॅटन्स  -- स्वारोवस्की क्रिस्टल वर्ल्ड
- इन्सब्रुक --- ओरिएंटेशन टूर
- म्युनिक --- ओरिएंटेशन टूर , मरिनप्लाट्झ येथे फ्री टाइम

  - **भोजन** --- कॉक्स ॲन्ड किंगच्या पध्दतीनुसार या सहलीवरही तुम्हाला घरगुती चवीच्या भारतीय भोजनाचा मनमुराद आस्वाद घेता येतो.त्यामुळे स्थलदर्शनाचा आनंद घेण्याबरोबरच खास भारतीय पदार्थांच्या चवदार मेजवानीने आपल्या सहलीचा आनंद द्विगुणित करा.

**तपशिलवार सहल कार्यक्रम ----**

**दिवस १ ला --- सहलीचा आरंभ - म्युनिकला आगमन**

कॉक्स ॲन्ड किंग्ज आम्ही ट्रॅव्हलकरच्या ' पूर्वरंगी युरोप' सहलीत आपले स्वागत असो.या टूरचा आरंभ होतो कवी आणि विचारवंताचा तसेच उद्योजकांचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जर्मनीमधील म्युनिक या शहरातून. इमिग्रेशन आणि कस्टम्सच्या प्रक्रिया पूर्ण करुन बाहेर पडल्यावर तुम्हाला 'मिटींग पॉइंट'पाशी कॉक्स ॲन्ड किंग्जचा प्रतिनिधी भेटेल आणि तुम्ही तुमच्या हॉटेलकडे प्रस्थान कराल (चेक इन - दु.२.०० नंतर)

भारतामधून दीर्घ पल्ल्याचा विमान प्रवास करुन तुम्ही इथे पोहोचला आहात,त्यामुळे विश्रांती घेऊन प्रवासाचा शीण घालवता यावा यासाठी कॉक्स ॲन्ड किंग्जने आजचा दिवस मोकळा ठेवला आहे.आज तुम्ही विश्रांती घेऊन ताजे तवाने व्हा,वाटल्यास संध्याकाळी जवळपास एखादी फेरी मारा आणि उद्यापासून सुरू होणाऱ्या युरोप दर्शनासाठी स्वतःला सज्ज करा.    ( D )

**दिवस २ रा --- प्रागकडे प्रस्थान -- चेस्की क्रुमलोवची गायडेड सिटी टूर**

आज सकाळी आपण नाश्ताकरुन चेक आउट करतो.प्रागकडे जाताना वाटेत साउथ बोहेमियातील चेस्की क्रुमलोव या नितांत सुंदर शहराला भेट देतो.एखाद्या परिकथेतील असावं असं हे मोहक आणि शोभिवंत शहर युरोपमधील सुंदर शहरांच्या यादीत का समाविष्ट केलं जातं याचं उत्तर शहर दर्शन करताना आपोआप मिळतं.युनेस्कोच्या विश्‍व वारसा यादीत स्थान मिळवलेल्या या शहराचे मुख्य आकर्षण म्हणजे १३ व्या शतकातली चेस्की क्रुमलोव कॅसल.सदर्न बोहेमियाच्या इतिहासावर आपली नाममुद्रा कोरणाऱ्या रोझेनबर्ग परिवाराच्या मालकिची ही कॅसल बोहेमियातील दुसरी सर्वात मोठी कॅसल आहे.या कॅसलमध्ये जतन केलेले वास्तुकलेचे नमुने पाहिल्यावर इतिहासकाळातील या वास्तूचे महत्व कळते.

नंतर आपण 'सिटी ऑफ हंड्रेड स्पायर्स'म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्राग या युरोपमधील सर्वात सुंदर शहराकडे प्रस्थान करतो.तिथे पोहोचल्यावर हॉटेलमध्ये चेक इन करतो ( B,L,D )

**दिवस ३ रा --- प्राग -- गायडेड वॉकिंग सिटी टूर ,प्राग कॅसलला भेट**

'गोल्डन सिटी' म्हणून प्रसिध्द असलेल्या प्राग शहरात आपण एक गायडेड वॉकिंग टूर करतो.या सहलीची सुरवातच 'प्राग कॅसल' या जगातल्या सर्वात मोठ्या आकाराच्या कॅसलपासून होते.ही भव्य वास्तू बांधायला ४९ वर्षे लागली होती.या कॅसलमध्येच १२ व्या शतकातील रॉयल पॅलेस आहे,जिथून बोहेमियाचे सम्राट राज्यकारभार पाहात असत.या शहरातील गॉथिक शैलीतील सेंट.व्हायटस कॅथेड्रल हे या देशातील सर्वात मोठे कॅथेड्रल आहे.या सहलीत प्राग शहराचे वैशिष्ट्य मानलेल्या,सहाशे वर्षे पुरातन चार्ल्स ब्रिजचे दर्शनही घडते.या पुलाची शोभा वाढवण्यासाठी इथे १७ व्या शतकातील ऐतिहासिक व्यक्तिंचे पुतळे उभारलेले आहेत.या सहलीचा शेवट आपण प्रागच्या ओल्ड टाउन स्क्वेअर या पर्यटकप्रिय भागात करतो.अनेक प्राचीन वास्तू इथे या शहराच्या इतिहासाच्या खुणा सांगत उभ्या आहेत.त्यातील सर्वात महत्वाची म्हणजे'अॅस्ट्रोनॉमिकल क्लॉक' .स्थानिकांमध्ये ऑरलोज म्हणून प्रसिध्द असलेल्या या घड्याळातील खगोलशास्त्रिय तबकडी आणि दर तासाला दिसणारी अपोस्टल मिरवणुक पाहायला पर्यटक गर्दी करतात.प्रागच्या स्ट्राहोव भागात आपल्याला नव्या जुन्याचा संगम साधणाऱ्या इमारती पाहायला मिळतात.या पदयात्रेमध्ये प्राग शहरातील रस्त्यांवरुन,गल्ल्या बोळांतून चालताना स्थानिक बाजार,त्यातील कलात्मक गोष्टी,आपापली कला सादर करणारे कलाकार यांचे प्रसन्न करणारे दर्शन घडते.प्राग कॅसलमध्ये जाताना तिथल्या पुलावरुन मागे पाहिल्यावर या शहराचे ऐतिहासिक केंद्र आणि त्याला विळखा

घालणारी वितावा नदी असे अतिशय नयनरम्य दृश्य दिसते,ते पाहिल्यावर तुम्ही या शहराचा प्रेमात पडल्याशिवाया राहात नाही.

रात्रीच्या भोजना नंतर आपण आपल्या हॉटेलवर परत येतो. ( B,L,D )

**दिवस ४ था --- बुडापेस्टकडे प्रस्थान -- ब्रातिस्लावाची ओरिएंटेशन टूर .**

आज आपण निघतो हंगेरीची राजधानी असलेल्या आणि डॅन्युब नदीच्या दोन काठांवर मिळून वसलेल्या बुडापेस्ट शहराकडे.मुळात ही दोन वेगवेगळी शहरं होती आणि सन १८७३ मध्ये ती एकत्र आली.

वाटेत आपण स्लोवाकिया देशाची राजधानी असलेल्या ब्रातिस्लावा या शहराला भेट देतो.या शहराचे वैशिष्ट्य म्हणजे ही जगातली एकमेव अशी राजधानी आहे जिची हद्द दोन स्वतंत्र देशांना (ऑस्ट्रिया आणि हंगेरी) भिडलेली आहे.तसेच डॅन्युब नदिच्या दोन्ही काठांवर पसरलेलं हे शहर,मोरावा नदीच्या डाव्या काठावरही आहे.२०१७ मध्ये युरोपियन युनियनमधील तीसरे सर्वात श्रीमंत ( जीडीपी पर कॅपिटाच्या निकषावर)शहर म्हणून ब्रातिस्लावाची निवड करण्यात आली आहे.इतिहासकाळात वेगवेगळ्या नावांनी ओळखल्या जाणाऱ्या या शहराला ब्रातिस्लावा हे नाव १९१९ सालच्या मार्च महिन्यात मिळाले.आपण या शहराची ओरिएंटेशन टूर करतो.

त्यानंतर बुडापेस्टकडे आपला प्रवास पुन्हा सुरू होतो.बुडापेस्टला पोहोचल्यावर आपण हॉटेलात चेक इन करतो. ( B,L,D )

**दिवस ५ वा -- व्हिएन्नाकडे प्रस्थान -- बुडापेस्टची गायडेड सिटी टूर**

आज आपण रोमन काळापासूनचा इतिहास लाभलेल्या बुडापेस्ट शहराची गायडेड सिटी टूर करतो.या शहराच्या मधून वाहणाऱ्या डॅन्युब नदीमुळे या शहराला एक वेगळीच शोभा प्राप्त झाली आहे.डॅन्युब नदीच्या बुडा काठावर उभारलेली फिशरमन्स बॅस्टियन ही तटबंदी म्हणजे हे शहर वसवणाऱ्या सात जमातींचे प्रतिक.या ठिकाणाहून सेंट स्टिफन्स कॅथेड्रल या चर्चचे सुरेख दर्शन घडते.यानंतर आपण डॅन्युब ओलांडून उजव्या काठावर येतो,तिथे वेस्टमिनिस्टर पॅलेसच्या धर्तीवर बांधलेली पार्लमेंट बिल्डिंग पाहायला मिळते.या शहरातील आवर्जून पाहावा असा चौक म्हणजे ‘हिरोज स्क्वेअर’.या चौकात हंगेरीच्या स्थापनेला एक हजार वर्षे पूर्ण झाल्याबद्दल उभारलेलं ‘मिलिनियम मेमोरियल ’ आहे. या स्मारकातील हंगेरीची स्थापना करणाऱ्या सात टोळ्यांच्या प्रमुखांच्या पुतळ्यावरुन या चौकाला हिरोज स्क्वेअर म्हणतात.बुडा आणि पेस्ट या शहरांना जोडणारे सात पुल डॅन्युब नदीवर आहेत

त्यातील सर्वात जुना म्हणजे ‘ चेन ब्रिज’ .नदीवरील हा सर्वात पहिला कायमस्वरुपी पूल सुरु झाला सन १८४९ मध्ये.या पुलाबरोबरच आपण हंगेरीचा पहिला सम्राट सेंट स्टिफन याचा अश्वारुढ पुतळाही पाहातो.

बुडापेस्ट दर्शन करुन आपण मध्ययुरोपमधील ऑस्ट्रीया या निसर्गरम्य आणि कलासंपन्न देशाकडे आपला मोर्चा वळवतो.या देशातील चित्रकला आणि संगीताची दीर्घ परंपरा लाभलेल्या व्हिएन्ना या शहराकडे आपण प्रस्थान करतो.कॉफी हाउसेस पासून ते वाइन टॅवर्नपर्यंत अनेक कारणांसाठी व्हिएन्ना पर्यटक प्रिय आहे.आपण या शहरात पोहोचल्यावर हॉटेलमध्ये चेक इन करतो ( B,L,D )

दिवस ६ वा --- साल्झबर्गकडे प्रस्थान -- व्हिएन्नाची गायडेड सिटी टूर,शॉनबर्न पॅलेसला भेट, मौथौजन कॉन्स्ट्रेशन कॅम्पला भेट

आज आपण ब्रेकफास्टनंतर चेक आउट करतो आणि व्हिएन्ना शहराची गायडेड टूर करतो.ऑस्ट्रियाची राजधानी असलेलं हे शहर इतिहासातील शक्तीशाली बॅबनबर्ग आणि हॅब्सबर्ग राजवटीचे केंद्र होते.या शहराला कलेचा वारसाही लाभलेला आहे.त्यामुळे इथे फिरताना इथल्या देखण्या ऐतिहासिक वास्तू आणि या शहराच्या वातावरणातील उत्साह तुम्हालाही प्रभावित केल्याशिवाय राहात नाही.

या सिटी टूरचा आरंभ आपण तीनशे वर्षांचा इतिहास लाभलेल्या शॉनबर्न पॅलेसपासून करतो.१४४१ दालनांचा हा बारोक शैलीतील भव्य पॅलेस तुम्ही कदाचित जॅकी चॅनच्या आर्मर ऑफ गॉड किंवा जेम्स बॉन्डच्या द लिव्हिंग डे लाइट या चित्रपटातून पाहिला असेल.आज ही राजेशाही वास्तू प्रत्यक्ष पाहिल्यावर एक वेगळाच आनंद होतो.त्यानंतर व्हिएन्नामधील सुप्रसिध्द ‘रिंग’ या तीन पदरी बुलेवार्डवरुन फेरफटका मारताना शहरातील ऑपेरा हाऊस, सेंट.चार्ल्स चर्च( फोटो स्टॉप) ,इम्पिरियल पॅलेस( हॉफबर्ग)( फोटो स्टॉप),पार्लमेंट,टाउन हॉल अशा महत्वाच्या वास्तू पाहायला मिळतात.या फेरफटक्यामध्ये इतिहासकाळातील हॅब्सबर्ग राजवटीच्या खाणाखुणा आणि या शहराची सांस्कृतिक परंपरा याची झलक अनुभवायला मिळते.

त्यानंतर आपण दुसऱ्या महायुध्दाच्या काळ्या आठवणी जपणारे स्थान पाहायला अप्पर ऑस्ट्रियात येतो. हे ठिकाण म्हणजे मौथौजन कॉन्स्ट्रेशन कॅम्प .दुसऱ्या महायुध्दात जर्मनीने ऑस्ट्रियावर कब्जा केल्यानंतर १९३८ ते ४५ या काळात इथे युरोप मधल्या सर्वात मोठ्या छळ छावण्यांपैकी एक उघडली होती.या छळ छावणीत सगळ्या युरोपमधून पकडून आणलेले सुमारे दोन लाख लोक ठेवण्यात आले होते आणि इथल्या छळापुढे त्यातले जेमतेम

निम्मेच लोक टिकाव धरू शकले.आज हे स्मारक ऑस्ट्रीयाच्या इतिहासातील काळ्या दिवसांच्या स्मृती जतन करत आहे.

त्यानंतर आपण येतो ऑस्ट्रीयातील सुरेल शहर म्हणून प्रसिध्द असलेल्या साल्झबर्गमध्ये.जर्मनीच्या सरहद्दीनजिक असलेल्या या शहराला इस्टर्न आल्प्सचे सौंदर्य जसे लाभलेले आहे तसाच सुरांचा वारसाही लाभलेला आहे,कारण हे आहे जगप्रसिध्द संगीतकार मोझार्ट याचे जन्म गाव.तसेच आधुनिक काळात हॉलिवुडचा लोकप्रिय ‘ साउंड ऑफ म्युझिक’ हा चित्रपट ही इथेच चित्रित झाला होता.‘साल्झबर्ग’ नावाचा अर्थ होतो ‘सॉल्ट कॅसल’ ,इथल्या साल्झॅक नदीकाठी मिठाच्या खाणी असल्याने हे नाव पडले.या नदीने शहराचे अल्टस्टाड ( जुने शहर ) आणि न्युस्टाड(नवे शहर) असे दोन भागात विभाजन केले आहे.साल्झबर्गला पोहोचल्यावर आपण हॉटेलमध्ये चेक इन करतो. ( B,L,D )

**दिवस ७ वा ---- इन्सब्रुककडे प्रस्थान -- साल्झबर्गची गायडेड वॉकिंग सिटी टूर,स्वारोवस्की क्रिस्टल वर्ल्डला भेट , इन्सब्रुकची ओरिएंटेशन टूर.**

आज आपण साल्झबर्ग शहरात गायडेड वॉकिंग सिटी टूर करतो.युनेस्कोच्या विश्व वारसा यादीत समाविष्ट असलेल्या या शहराला संगीतकार वूल्फगँग अमॅड्यूअस मोझार्ट आणि साउंड ऑफ म्युझिक हा चित्रपट याबरोबरच इतर अनेक संदर्भ आहेत.सिटी टूरमध्ये आपण सुरेख मिराबेला गार्डनला भेट देतो.सन १६०६ मध्ये उभारलेल्या या शाही वास्तूला सन १६१२ मध्ये इटालियन भाषेतील मिराबिले म्हणजे आश्चर्यकारक या शब्दावरून हे नाव देण्यात आले.या मिराबेल पॅलेससमोरच्या उद्यानाची रचना भौमितिक आकारात केलेली आहे आणि त्यात पुराणकथेतील व्यक्तिरेखांचे पुतळे उभारलेले आहेत.याच उद्यानात साउंड ऑफ म्युझिक चित्रपटातील ‘डो रे मी ’ हे गाणे चित्रित करण्यात आले होते.

आजचे आपले पुढचे ठिकाण लखलखते,झगमगते आहे.आपण येतो स्वारोवस्की कंपनीने शताब्दी साजरी करताना सुरू केलेल्या‘स्वारोवस्की क्रिस्टल वर्ल्ड’ या अनोख्या संग्रहालयामध्ये.या जमिनीखालच्या संग्रहालयातील चेम्बर ऑफ वंडर्स मध्ये मांडलेल्या एका पेक्षा एक अद्भुत क्रिस्टलच्या वस्तू पाहून सारेच थक्क होतात.सुरवातीलाच पाहायला मिळते ११ मीटर उंच आणि ४२ मीटर लांब अशी भव्य क्रिस्टल वॉल.तसेच जगातील सर्वात मोठा आणि सर्वात लहान क्रिस्टलही इथे पाहायला मिळतो.जगभरातील सुमारे सात दशलक्ष लोक हा संग्रह पाहून आश्चर्य चकीत झाले आहेत,आता त्यात तुमचीही भर पडते.

पुढच्या प्रवासात आल्प्सचा सहवास लाभलेल्या ऑस्ट्रियाच्या अप्रतिम निसर्गसौंदर्याची झलक सतत पाहायला मिळते. आपण आता निघालोय इन्सब्रुक शहराकडे.इन

नदीवरील पुलामुळे( ब्रुक) या टुमदार शहराला इन्सब्रुक हे नाव मिळाले आहे.हिवाळी क्रिडा प्रकारांसाठी जगभरातील पर्यटकांमध्ये प्रसिध्द असलेल्या या शहरात आजपर्यंत दोन वेळा विंटर ऑलिम्पिक्स भरले आहे.या शहराची ओरिएंटेशन टूर करताना आपल्याला इन्सब्रुकचा ऐतिहासिक वारसा पाहायला मिळतो.त्यातील महत्वाची वास्तू म्हणजे गोल्डन दाची अर्थात गोल्डन रुफ.आज या शहराचे सर्वात मोठे आकर्षण ठरलेली,सोन्याचे छत धारण करणारी ही खिडकी १५ व्या शतकात सम्राट मॅक्सिमिलियन १ ला याच्या विवाह समारंभानिमित्त निर्माण करण्यात आली.या खिडकीचे छत २६७५ सुवर्णजडीत कौलांनी जडवलेलं आहे.त्यानंतर आपण हॉटेलमध्ये चेक इन करतो.( B,L,D )

**दिवस ८ वा ---- परतीची वाटचाल . म्युनिकची ओरिएंटेशन टूर.मरिनप्लाट्झ येथे फ्री टाइम.म्युनिकहून परतीचे फ्लाइट.**

आज आपल्या या रंगतदार युरोप सहलीचा समारोप होणार.आज सकाळी आपण ब्रेकफास्ट करुन चेक आउट करतो आणि म्युनिककडे प्रस्थान करतो.प्राचीन काळी येथे बेनेडिक्टीयन मॉन्क्स राहात होते त्यावरुन या शहराचे नाव पडले म्युनिक.आपण या शहराची ओळख करुन देणारी ओरिएंटेशन टूर करतो.या फेरफटक्यात सर्वात आधी आपण पाहातो या शहराचे ऐतिहासिक शासक असलेल्या बव्हारियन राजघराण्याचे निवासस्थान असलेला ‘ निम्फेनबर्ग पॅलेस’.आज दिसणारी बारोक शैलीतली ही वास्तू मूळात सतराव्या शतकात बांधण्यात आली.या आकर्षक,भव्य राजवाड्याभोवती ४९० एकरांमध्ये पसरलेले सुरेख उद्यान आहे. मूळात इटालियन शैलीतील हे उद्यान नंतर फ्रेंच पध्दतीने आणि अखेर इंग्लिश शैलीत तयार करण्यात आले आहे.या उद्यानात कलात्मकपणे खेळवलेला पाण्याचा प्रवाह आणि कारंजी यामुळे संपूर्ण दृश्याचे सौंदर्य द्विगुणित होते. या देखण्या वास्तूसमोर फोटो स्टॉप घेऊन आपण आपल्या युरोप सहलीच्या आठवणी कॅमेऱ्यात बंद करतो. पुढच्या फेरफटक्यात आपल्याला पिनाकोथेक आर्ट म्युझियम दिसते,जिथे ओल्ड मास्टर्सच्या अभिजात चित्रकृती जतन केल्या आहेत.तसेच जगप्रसिध्द ‘ हॉफब्रॉहौस’या एकेकाळच्या शाही ब्रुवरीच्या बियर हॉलचे दर्शनही आपल्याला घडते.१९ व्या शतकातले नॅशनल थिएटर,बव्हारियाच्या राजघराण्याचे शाही निवासस्थान असलेला रॉयल पॅलेस,१९७२ साली या शहरात भरलेल्या ऑलिम्पिकच्या स्मृती जतन करणारा ऑलिम्पिक स्टेडियम,आपला उंच मनोरा मिरवणारे पुरातन सेंट पीटर्स चर्च,जुळ्या मनोऱ्यांचे फ्राउनखिर्चे अर्थात कॅथेड्रिल ऑफ अवर ब्लेस्ड लेडी,या शहराच्या जुन्या भागाचा केंद्रबिंदू असलेला मरिअन प्लाट्झ हा चौक,स्थानिक उत्पादनांनी खच्चून भरलेल्या रंगीबेरंगी स्टॉल्सनी सजलेलं व्हिक्तुआलियन मार्केट  हे सगळं बघताना वेळ कसा जातो

कळतच नाही.या शहरातील मरियनप्लाट्झ या ऐतिहासिक चौकात आपल्या थोडा मोकळा वेळ मिळतो,त्यामुळे युरोपचा निरोप घेता सुव्हेनिअर्स विकत घ्यायची संधी मिळते.

संपूच नयेत असे वाटणारे क्षण जसे संपतात तशीच आपली ही रंगतदार सहलही आज संपते,मात्र कॉक्स ॲन्ड किंग्ज आम्ही ट्रॅव्हलकरच्या या सहलीत पाहिलेल्या,अनुभवलेल्या युरोपची मानसचित्रे आपल्या सोबत सदैव राहणार असतात.विमानतळावर जाऊन घराकडे जाणारे विमान पकडतानाही कॉक्स ॲन्ड किंग्ज आम्ही ट्रॅव्हलकरच्या पूर्वरंगी युरोप सहलीमधल्या सुखद आठवणींचा फ्लॅशबॅक तुम्हाला नक्की उत्साहित करेल याचा विश्वास आम्हाला वाटतो.तसेच पुन्हा आपली भेट  लवकरच दुसऱ्या एखाद्या टूरवर होईल याची अपेक्षा ठेवून आम्ही आपला निरोप घेतो.( B,L )

**विशेष सूचना --- कदाचित काही तांत्रिक अडचणींमुळे हा सहल कार्यक्रम वेगळ्या क्रमाने अमलात येऊ शकतो.**